# तरुण भारत
सातारा


डी. पी. भोसले कॉ... ग्रंथालय



# जिल्हा युवा महोत्सवात आला तरुणाईच्या कलेला बहर

## ४२ महाविद्यालयांचा सहभाग, निकाल जाहीर



**कराड : पथनाट्य सादर करताना सातारा येथील छत्रपती शिवाजी कॉलेजचे विद्यार्थी.**



**कराड : युवा महोत्सवात सहभागी विजेत्या संघाच्या विद्यार्थिनींनी सादर केलेल्या लोकनृत्याला प्रेक्षक विद्यार्थ्यांनी मोठ्या जल्लोषात दाद दिली.**



प्रतिनिधी
कराड

येथील सद्गुरू गाडगे महाराज महाविद्यालयात शिवाजी विद्यापीठांतर्गत ३५ वा जिल्हास्तरीय युवा महोत्सव जल्लोषात पार पडला. सोमवारी रात्री दहा वाजेपर्यंत महोत्सवातील विविध स्पर्धांमध्ये तरूणाईच्या कलेला बहर आला होता. जिल्ह्यातील ४२ महाविद्यालयांच्या विद्यार्थी, विद्यार्थिनींनी यात सहभाग घेतला.

संयोजक व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहन राजमाने व शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण मंडळाचे संचालक डॉ. डी. के. गायकवाड यांनी महोत्सवातील स्पर्धांचा निकाल जाहीर केला.

गटनिहाय पहिले तीन विजेते पुढीलप्रमाणे– वक्तृत्व मराठी– छत्रपती शिवाजी कॉलेज सातारा, श्रीपतराव कदम महाविद्यालय शिरवळ, यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स सातारा. वक्तृत्व हिंदी–श्रीपतराव कदम महाविद्यालय शिरवळ, छत्रपती शिवाजी कॉलेज सातारा, यशवंतराव चव्हाण इन्टिट्यूट ऑफ सायन्स सातारा.

वक्तृत्व इंग्रजी–शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय सातारा, किसन वीर महाविद्यालय, कर्मवीर अभियांत्रिकी महाविद्यालय सातारा.

वादविवाद– यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स सातारा, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय सातारा, सद्गुरू गाडगे महाराज महाविद्यालय. सुगम गायन–धनंजयराव गाडगीळ वाणिज्य महाविद्यालय, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय कराड, कला व वाणिज्य महाविद्यालय पुसेगाव, मुधोजी महाविद्यालय फलटण.

भारतीय समूहगीत– धनंजयराव गाडगीळ महाविद्यालय सातारा, मुधोजी महाविद्यालय फलटण, वेणूताई चव्हाण महाविद्यालय कराड.

मूकनाट्य–सद्गुरू गाडगे महाविद्यालय कराड, धनंजयराव गाडगीळ महाविद्यालय सातारा, डी. पी. भोसले महाविद्यालय कोरेगाव, लालबहादूर शास्त्री महाविद्यालय सातारा.

पथनाट्य–छत्रपती शिवाजी कॉलेज सातारा, अरविंद गवळी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग सातारा, मुधोजी महाविद्यालय फलटण.

लघुनाटिका–प्रा. संभाजीराव कदम देऊर, सद्गुरू गाडगे महाराज महाविद्यालय कराड, नामदेवराव सूर्यवंशी बेडके कॉलेज फलटण, यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट सातारा.

एकांकिका–मुधोजी महाविद्यालय फलटण, शंकरराव जगताप महाविद्यालय वाघोली, किसन वीर महाविद्यालय वाई, सद्गुरू गाडगे महाराज महाविद्यालय कराड.

लोकसंगीत वाद्यवृंद–किसन वीर महाविद्यालय वाई, भैय्यासाहेब माने महाविद्यालय म्हसवड, दहिवडी कॉलेज दहिवडी.

लोकनृत्य–यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स सातारा, कर्मवीर अभियांत्रिकी महाविद्यालय सातारा, तृतीय मुधोजी महाविद्यालय फलटण, छत्रपती शिवाजी कॉलेज सातारा.

लावणी–सद्गुरू गाडगे महाराज महाविद्यालय कराड, मुधोजी महाविद्यालय फलटण, छत्रपती शिवाजी कॉलेज सातारा.

यावेळी महोत्सव समितीच्या सचिव डॉ. रेश्मा दिवेकर, प्राचार्य एम. एल. होनगेकर, प्राचार्य एस. डी. कांबळे, डॉ. सौ. भारती पाटील व सदस्य उपस्थित होते.